# 3 भारतातील गव्हर्नर जनरल व व्हाईसरॉय

## गव्हर्नर -

- **बंगालचा पहिला गव्हर्नर - रॉबर्ट क्लाईव्ह**
  **बंगालचा शेवटचा गव्हर्नर - वॉर्न हेस्टींग्ज**
- **बंगालचा पहिला गव्हर्नर जनरल - वॉरेन हेस्टींग्ज (1773 रेग्यूलेटींग ॲक्टनुसार)**
  **बंगालचा शेवटचा गव्हर्नर जनरल - विल्यम बेंटीग**
- **भारताचा पहिला गव्हर्नर जनरल - विल्यम बेंटीग (1833 च्या चार्टर ॲक्टनुसार)**
  **भारताचा शेवटचा गव्हर्नर जनरल - लॉर्ड कॅनिंग**
- **भारताचा पहिला व्हॉईसरॉय - लॉर्ड कॅनिंग (1 नोव्हेंबर, 1858 च्या जाहीरनाम्यानुसार)**
  **भारताचा शेवटचा व्हॉईसरॉय - लॉर्ड माऊंटबॅटन**
- **स्वतंत्र भारताचा पहिला गव्हर्नर - लॉर्ड माऊंटबॅटन**
  **स्वतंत्र भारताचा पहिला भारतीय गव्हर्नर - सी. राजगोपालचारी**

## बंगालचे गव्हर्नर

**1) रॉबर्ट क्लाइव - (1757-60)**

- प्लासीच्या युद्धात विजय (1757)
- 1760 - फ्रान्सचा पराभव.

**2) जे. हॉलवेल - 1760.** अंधार कोठडीचे वर्णन केले.

**3) वेन्सिटार्ट - (1760-1765)**

- बक्सारच्या युद्धात विजय.

**4) रॉबर्ट क्लाईव (1765-1767)**

(क्लाईव्हने अलाहाबाद व कोरा शहाआलम दिले होते परंतु बादशहाच्या सेवेचे बक्षीस म्हणुन त्याने ते मराठ्यांना दिले. - वनसेवा मुख्य 2017)

- अलाबादचा करार अवध नवाब व शहाआलम यांच्या सोबत.
- बंगालमध्ये दुहेरी शासन/दुहेरी राज्यव्यवस्था/द्वैधशासन. < बंगाल - महम्मद रजाखान; बिहार -सिताबराय

**5) वेरेलस्ट (1767-69)**

**6) कार्टियर (1769-72)**

**7) वॉरेन हेस्टिंग्ज (1772-74)**

# वॉरेन हेस्टिंग्ज (1772-1785)



- 1772 ते 1774 बंगालचा शेवटचा गव्हर्नर.
- 1774 ते 1785 बंगालचा पहिला गव्हर्नर जनरल. (1773 च्या ॲक्टनुसार)

  **1772 -**
  - कलेक्टर पदाची निर्मिती केली.
  - दुहेरी राज्यव्यवस्था बंद करुन याच वर्षी लिलाव पद्धत सुरु केली. (1776 मध्ये ती बंद करण्यात आली.)
  - राजस्व मंडळाची स्थापना करण्यात आली. (महसूल बोर्ड) करवसुलीसाठी. (बोर्ड ऑफ रेव्हेन्यु)
  - जिल्हा स्तरावर फौजदारी व दिवाणी न्यायालयांची स्थापना. कलकत्त्याला सदर दिवाणी व सदर निजामत अदालत.
- 1773 च्या रेग्यलेटिंग ॲक्ट-यानुसार कलकत्त्यात सर्वोच्च न्यायालयाची 1774 मध्ये स्थापना व वर्गमित्र ईलाना इंफे याची नेमणुक सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी केली.
- 1774 परकीय व्यापार मंडळाची स्थापना केली. त्यात 11 सदस्य होते व शेजारील नेपाळ, भुटान, तिबेट यांच्याशी परकीय व्यापार केला. (सोसायटी ऑफ ट्रेड)
- प्रथम मराठा युद्ध (1775-82) - सुरत, पुरंदर, वडगाव, सालाबाईचा तह.
- 'कोड ऑफ जिन्ह लॉ' नावाचे कायदेविषयक पुस्तक - हिंदू व मुस्लीम कायद्याचे संकलन.
- 1781 चा अधिनियम - यानुसार - ग. जनरल इन कौन्सिल व कलकत्ता सर्वोच्च न्यायालय यांच्या अधिकारक्षेत्राचे स्पष्ट विभाजन.
- 1784 चा पिटस् इंडिया ॲक्ट.
- या ॲक्टनुसार दोन मंडळे स्थापन करण्यात आली.
  1. बोर्ड ऑफ कंट्रोल - कंपनीच्या कारभारावर नियंत्रण.
     सदस्य संख्या - 6
  2. बोर्ड ऑफ डायरेक्टर - सरकारी कर्मचाऱ्यावर नियंत्रण.
     सदस्य संख्या - 24
- दुसरे म्हैसूर युद्ध (1780-84) व मंगलोरचा करार.
- रोहिला युद्ध - 1774.
- नंदकुमार प्रकरण (1775)
- बनारसचा 'राजा चेतसिंह' प्रकरण, (1778) - यामुळे हेस्टिंगजवर ब्रिटनमध्ये महाभियोग.
- अवधच्या बेगमांचे प्रकरण (1782).
- एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल (1784) - विलियम जोन्स.
- कलकत्त्यात - 'सरकारी टाकसाळ सुरु' कागदी चलनाचा प्रयोग अयशस्वी.
- याच्याच काळात कंपनीला - मीठ बनवायचा अधिकार.
- 1781 - कलकत्ता मदरसाची स्थापना.
- हेस्टिंग्जला - अरबी व फारसी माहिती असून तो बंगाली बोलायचा.
- चार्ल्स विल्कीन्सनने भगवतगितेचे इंग्रजीत रुपांतर केले. त्यांची प्रस्तावना हेस्टिंगने लिहिली.
- हेस्टिंगने - संन्याशांच्या बंडावर नियंत्रण लादले. ज्याचा उल्लेख बंकिमचंद्रच्या 'आनंदमठ' या कादंबरीत.(वंदे मातरम्)
- विवाहाकर बंद केले. गुलामगिरीची प्रथा समाप्त केली.
- महसूल वसुलीचे अधिकार लिलाव पद्धतीने केले. जो जास्त कर वसूल करेल त्याला 5 वर्षांसाठी कालावधी केला, नंतर 1777 ला तो एक वर्षाचा केला.
- 1774 ला सर्व जिल्ह्यांचे सहा डिव्हिजन केले. प्रत्येक डिव्हिजनला एक कर समिती/परिषद. तिचा अध्यक्ष कलकत्ता कौन्सिलचे सदस्य असायचा. ही परिषद कर व त्यासंबंधी बाबींवर निर्णय घेई.
- इंग्रज अधिकाऱ्यांच्या मदतीसाठी डिव्हिजनला दिवाण व जिल्ह्याला नायब दिवाण नियुक्त.
- संपूर्ण हिशोब तपासण्यासाठी राजा राजवल्लभ - नावाचा भारतीय पदाधिकारी नेमला.
- 1781 ला डिव्हिजन कौन्सिल बंद. कलेक्टरांच्या कर वसुली अधिकार तसेच भारतीय कर्मचाऱ्यांचा 4 सदस्यांच्या रेव्हेन्यू बोर्डला - वसुलीचे अधिकार पण कर ठरविण्याचे अधिकार नाही.(निर्धारणा)
- निरनिराळ्या भागात जकात वसुलीसाठी जकातनाके बसविले.
- कलकत्ता, हुबळी, ढाका, मुर्शिदाबाद, पटना.(मॅक फर्सन 1 वर्ष18 महिने हंगामी गव्हर्नर 35 जिल्हयाची निर्मिती)

# लॉर्ड कॉर्नवॉलिस (1785-1793)



- भारतात येण्यापूर्वी अमेरिकन स्वातंत्र्य युद्धात सरसेनानी म्हणून काम पाहिले होते.
- पीट्स ॲक्टनुसार या व्यक्तीस विशेष दोन अधिकार देण्यात आले होते.
- क्लाईव्ह व हेस्टींग सारखा लोभी व भ्रष्टाचारी नव्हता कारण उमराव घराण्यातील राजपुत्र होता.
- भारतात येण्यापूर्वी व भारतातून जाण्यापूर्वी ईस्ट इंडिया कंपनीचा सर्व कर्मचाऱ्यांनी संपत्तीचे विवरण जाहीर करणे बंधनकारक केले. याचा परिणाम ईस्ट इंडिया कंपनीवर दूरगामी झाला. भारताबद्दल सुरुवातीला फारसे माहीत नसल्याने तो जॉन शोअर व जोनायन ग्रांट यांचा सल्ला घ्यायचा.

## न्यायालयीन सुधारणा

- जिल्हा न्यायालयांच्या वर चार प्रांतिक न्यायालयांची स्थापना कलकत्ता, ढाका, पटना व मुर्शिदाबाद.
- या चारांवर दिवाणी अदालत कलकत्ता येथे होते
- करासंबंधी खटले व दिवाणी खटले हा फरक समाप्त करुन सर्व दिवाणी खटले चालवण्याचा या न्यायालयांना अधिकार दिला. जिल्हाधिकाऱ्याकडील न्यायीक शक्ती काढून घेतली.
  **(राज्यसेवा पूर्व 2015)**
- कॉर्नवॉलिसने बऱ्याच ठिकाणी भारतीय व्यक्ती काढून युरोपियनांची नेमणुक केली.
- 1793 च्या नियमानुसार निश्चित केले की, साक्षीदाराच्या विशिष्ट धर्माचा खटल्यावर कोणताही प्रभाव पडणार नाही.
- फौजदारी खटले मुस्लीम कायद्यानुसार तर मुलकी खटले संबंधित व्यक्ती ज्या धर्माची असेल त्यानुसार चालतील. दोघांत तफावत आढळली तर इंग्लिश कायद्याच्या आधारे न्यायदान केले जाईल.
- वेगवेगळ्या जिल्ह्यातून राहणाऱ्या युरोपियांना त्या त्या जिल्ह्याच्या न्यायालयीन कक्षेत आणले.
- भारतात पूर्वी अस्तित्वात नसलेल्या कायद्याच्या सर्वोच्चतेचा नियम (Sovereignty at law) कॉर्नवॉलिसने लागू केला.
- कॉर्नवॉलीसने भारतात न्यायव्यवस्था सुरळीत करण्यासाठी पंचस्तरीय न्यायव्यवस्था सुरु केली.

सर्वात वर - King-in-council- सम्राट (खटला 5000 रु. पेक्षा जास्त असावा)

↑

सदर दिवाणी अदालत (कलकत्ता) - गव्हर्नर जनरल व त्याच्या कौन्सिल सदस्य (1000 रु. च्या वरचे खटले)

↑

चार प्रांतिक न्यायालये (कलकत्ता, ढाका, पटना व मुर्शिदाबाद) येथे - युरोपीय न्यायाधीश असत. (1000 रु. पर्यंतचे खटले)

↑

नगर/जिल्हा न्यायालय (500 रु. पर्यंत खटले)

↑

रजिस्ट्रॉर (युरोपियन व्यक्ती, 200 रु. पर्यंत खटले)

↑

मुंसिफ - (भारतीय व्यक्ती, 50 रु. पर्यंतचे खटले)
सर्वात छोटा न्यायिक अधिकारी

## पोलिस प्रशासनात सुधारणा

- कॉर्नवॉलिसने - पोलीस दलावरील - जमीनदारांचे अधिकार काढून घेतले.
- दर 20 मैलावर पोलीस चौक्या वसविल्या जिल्ह्याचे क्षेत्रफळ 400 चौ.कि.मी. निश्चित करण्यात आले.
- प्रत्येक जिल्ह्यावर एक 'दरोगा' नेमला जो भारतीय अधिकारी होता. त्याच्या मदतीसाठी पोलीस नियुक्त केले.
- 1791 च्या नियमाने पोलीस अधीक्षकांच्या (S.P.) शक्तिंचे निर्धारण केले.
- SP हे पद इंग्लंडमध्येदेखील नव्हते. ते भारतात सुरु केले. पोलीस प्रशासनात सुधारणा करणारा भारतातील पहिला व्यक्ती होता.

## प्रशासकीय सुधारणा

- कॉर्नवॉलिसला भारतीय सिव्हिल सेवेचा जनक म्हटले जाते.
- प्रशासकीय व्यवस्थेच्या युरोपीयकरणावर भर दिला. सर्व उच्चपदे इंग्रजांसाठी आरक्षित केली गेली.

- भारतीयांना 500 पौंड वार्षिक वेतनापेक्षा कमी वेतनावर नियुक्ती करण्याचे आदेश दिले.
- भ्रष्टाचार बंद करण्यासाठी कर्मचाऱ्यांच्या पगारात वाढ करण्याचे सुचवले.
- संचालक मंडळाच्या नातेवाईकांना दिली जाणारी पदे, कोणालाही पात्रता नसताना दिली जाणारी पदे हे सर्व बंद केले.
- कॉर्नवॉलीस कोड तयार केला (म्हणजे शासकीय कामकाजासाठी तपशिलवार नियम.)

**महसूल सुधारणा**

- 22 मार्च, 1793 ला बंगाल - बिहारात - कायमधारा पद्धत सुरु केली.
- भारताच्या एकुण क्षेत्रफळापैकी 19% क्षेत्रफळावर ही करपद्धत होती. यात कुळ/शेतकरी → गुमस्ते→जमिनदार →सरकार असे टप्पे होते.
- देशाच्या 19% क्षेत्रफळावर ही पद्धत अस्तित्वात होती.
- भारतात बंगालसह बिहार, ओरिसा, बनारस व उत्तर कर्नाटक या प्रांतात ही पद्धत अस्तित्वात होती.
- एकुण मिळणाऱ्या कराच्या 89% कर शासनाला तर 11% कर जमिनदारांना दिला जात होता.
- ज्यानुसार - जमीनदारांना - जमिनीचे मालक समजण्यात आले.
- तिसरे म्हैसूर युद्ध (1789-92) श्रीरंगपट्टणमचा तह.
- महसूल प्रशासन व नागरी प्रशासन विभक्त केले.
- हेस्टिंग्जच्या 'ट्रेड बोर्डाच्या सदस्यांची संख्या 11 वरुन 5 केली.' ठेकेदारांऐवजी मालाच्या खरेदी-विक्रीसाठी 'कमिशन एजंट' ची नियुक्ती.
- भारतातील विणकर व उत्पादक यांनी आपला माल कंपनीलाच विकावा हे धोरण नष्ट केले.
- व्यापाराची चौकशी करण्यासाठी चार्ल्स ग्रँट या अधिकाऱ्याची नेमणुक केली.
- कलेक्ट्ररच्या कामाचे पर्यवेक्षण करण्यासाठी सर जॉन शोअर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून महसूल सुधारणा घडवून आणल्या.

## सर जॉन शोअर (1793-1798)





- कॉर्नवॉलीसच्या काळात हा राजस्व मंडळाचा अध्यक्ष होता.
- कॉर्नवॉलीसच्या कायमधारा पद्धतीला यांनी विरोध केला पण नंतर सहकार्यही केले.
- 1793 चा चार्टर ॲक्ट.
- याच ॲक्टनुसार बोर्ड ऑफ कंन्ट्रोलच्या सदस्याचा पगार भारतातून देण्याचे ठरविण्यात आले.
- खर्डाचे युद्ध - निजाम व मराठ्यांमध्ये (1795)
- अहमदशाह अब्दलीचा नातू 'झमनशहाचे' भारतावर आक्रमण.
- 1795 मध्ये सवाई माधवरावांचा मृत्यू.

## लॉर्ड रिचर्ड वेलस्ली (1798-1805)





- वयाच्या 37 व्या वर्षी भारतात नियुक्त.
- स्वत: ला बंगालचा सिंह म्हणून ओळखत होता.
- विस्तारवादी व सम्राज्यवादी मनोवृत्तीचा होता.
- भारतात येण्यापूर्वी ब्रिटनच्या संसदेचा सदस्य होता.
- भारतात ईस्ट इंडिया कंपनीचा विस्तार वाढविणे व फ्रेंचांचा प्रभाव नष्ट करणे ही त्याची दोन महत्त्वपूर्व उद्दिष्ट्ये होती.

**तैनाती फौज -**

- जनक - रिचर्ड वेलस्ली **(STI पूर्व - 2012)**
- भारतात सर्वप्रथम तैनाती फौज / साहाय्यक संधी ची सुरुवात. ही सर्वात प्रथम निजामने स्वीकारले (1798).

- तैनाती फौजेची भारतात सर्वप्रथम सुरुवात फ्रेंचांचा गव्हर्नर जोसेफ डुप्ले यांनी केली. परंतु त्यास नाव दिले नव्हते. (चंद्रनगरचा प्रशासक होता, दुरदृष्टी होती. **राज्यसेवा मुख्य-2012**) पैशाच्या बदल्यात भारतीय र7ाजांना लष्कर देणे ही पद्धत त्यांनीच सुरु केली.
- 1765 - रॉबर्ट क्लाईव्ह या गव्हर्नरने अवधचा राजा यास भाड्याने सैन्य दिले होते. हिंदी राज्यांना EIC च्या अधिपत्याखाली आणण्याचा प्रयत्न केला.
- कंपनीच्या प्रदेशात वाढ करण्यात आली.
- तैनाती फौजेमुळे दुसरे-इंग्रज मराठा युद्ध झाले. **(राज्यसेवा मुख्य 2013)**
- तैनाती फौज स्वीकारलेल्या राज्याचा क्रम :-

  है-हैद्राबाद - 1798<br>
  म्है-म्हैसूर - 1799<br>
  तं-तंजौर - 1799<br>
  अ-अवध - 1800<br>
  पे-पेशवा - 1802<br>
  भो-भोसले - 1803<br>
  शिं-शिंदे - 1803

### तैनाती फौजेच्या अटी -

- भारतीय राजाच्या परराष्ट्र संबंधावर कंपनी नियंत्रण ठेवेल.
- मोठ्या राजांना शांतता व सुव्यवस्थासाठी कंपनीची मौठी फौज ठेवावी लागेल आणि फौजेचे नियंत्रण इंग्रज अधिकाऱ्याच्या हाती असेल.
- ती राजे त्याऐवजी कंपनीला अधिकारयुक्त प्रदेश देतील.
- इंग्रजांचा अधिकारी रेसेडेन्सी ठेवावा लागेल.
- कंपनीच्या परवानगीशिवाय दुसऱ्या कोणत्या युरोपीयनांना सेवेत ठेवता येणार नाही.
- राजाच्या अंतर्गत कारभारात कंपनी हस्तक्षेप करणार नाही.
- कंपनीचे सैन्य राजधानीमध्येच वास्तव्य करेल.
- कंपनीच्या सैन्याचे नेतृत्व त्या राजाचा सेनापती करणार नाही.

### वेलस्लीने तैनाती फौजेचा अवलंब केला कारण :-

- फ्रेंचांचे अस्तित्व नष्ट करावयाचे होते.
- निजाम खर्डोच्या लढाईत मदत न केल्यामुळे नाराज होता म्हणून निमाजाने मॉन्सियर रेमंड या फ्रेंच लष्कर अधिकाऱ्याच्या मार्फत 14 हजार सैनिकांचे लष्कर उभा केले होते.
- महादजी शिंदे यांनी काऊंट डी बॉईन व मॉन्सियर पेरॉन या फ्रेंच अधिकाऱ्याच्या साह्याने 8000 पायदल व 8000 घोडदळ तयार केले होते.

### तैनाती फौजेमुळे कंपनीला झालेले फायदे :-

- साम्राज्यात फितूरता निर्माण झाली.
- भारतीय राजे दुर्बल बनले.
- भारतीय राज्याला मोठी फौज उभारता आली नाही.
- प्रत्येक राज्यात सैन्य म्हणून मोक्याच्या जागेवर नियंत्रण.
- इतर कोणत्याच युरोपीयनांना प्रवेश मिळाला नाही.
- सार्वभौमसंपन्न प्रदेश कंपनीला मिळाला.
- फ्रेंचाची भिती कायमची नाहीशी झाली.
- भारतीय राज्याच्या मदतीनेच इंग्रजांनी मोठी फौज उभारली.

### भारतीय प्रदेशावर झालेला विपरीत परिणाम :-

- भारतीय राज्यांनी आपले स्वातंत्र्य गमावले.
- अंतर्गत कारभारात ब्रिटीशांचा हस्तक्षेप वाढला.
- सार्वभौम संपन्न प्रदेश गमवला.
- आर्थिक हानी मोठ्या प्रमाणात झाली.
- सैनिक बेकार बनले.
- लूटमार, दरोडे याचे प्रमाण राज्यात वाढले.
- हिंदी लोकांसाठी कलकत्ता येथे फोर्ट विलियम महाविद्यालयाची स्थापना (1800). सिव्हिल सर्व्हीस सेवेमध्ये भरती झालेल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी **(राज्यसेवा मुख्य-2012)**
- चौथे म्हैसूर युद्ध (1799) यात टीपूचा मृत्यू.
- दुसरे मराठा युद्ध (1803-1806)
- तो पेशव्याच्या राजकारणाला - 'विकृत, कारस्थानी, कपटी' म्हणायचा. वेलस्लीने भारतात दोन सेनापती नेमले.

  1. उत्तर भारतात - जनरल लेक
  2. दक्षिण भारतात - ऑर्थर वेलस्ली (रिचर्ड वेलस्लीचा भाऊ)

**शैक्षणिक कार्य -**

- **1835** - शिक्षणाचे माध्यम इंग्रजी (मेकॉले)
- मॅकॉलेने दोन वेगवेगळे शिक्षणात मतप्रवाह तयार केले.
  1. भारतीयांना पौर्वात्य शिक्षण देणे. - सर एच.ए.विल्सन.
  2. भारतीयांना पाश्चात्य शिक्षण देणे. - सर चार्ल्स ट्रॅव्हेलियन.
- या दोन्हीही प्रवाहांना बेटींगने मॅकलोच्या मदतीने स्थापन केले होते.
- मॅकलोच्या मते भारतीय रंगरुपाने रक्ताने व शरीराने भारतीय असावेत परंतु बुद्धीने इंग्रज असावेत अशी शिक्षणपद्धती भारतीयात रुजविण्याचे काम केले. यालाच 'शिक्षणाचा झिरपता सिद्धांत' म्हणतात.
- 1835 - कलकत्ता वैद्यकीय महाविद्यालय.
  (1845 - महाराष्ट्र, ग्रँट मेडिकल कॉलेज, जगन्नाथ शंकरशेठ)

**प्रशासकीय कार्य -**

- कुर्ग, म्हैसूर, काचरजैतिया ही संस्थाने ताब्यात घेतली.
  **(वनसेवा मुख्य 2019)**
- कोळसा, चहा, लोह या घटकाकडे उत्पादन वाढीसाठी लक्ष दिले.
- ठगांचा बंदोबस्त करण्यासाठी स्वतंत्र पोलीस खाते (1830). त्यावर कमिशनर म्हणून मेजर स्लीम तर न्यायाधीश म्हणून स्मिथची नियुक्ती केली.
- 1833 - चा चार्टर ॲक्ट कंपनीचा चहा व चीनच्या व्यापारावरील एकाधिकाराची समाप्ती व बंगालचा गव्हर्नर जनरल भारताचा गव्हर्नर जनरल झाला.
- 1834 - ला आग्रा प्रांताची स्थापना.
- 1832 - च्या नियमाने दास प्रथा समाप्त केली.
- हिंदू धर्मानुसार ज्या व्यक्तीने दुसऱ्या धर्माचा स्वीकार केला त्याला वडिलोपार्जित संपत्ती मिळत नसे. पण बेंटिकने कायदा केला की ईसाई धर्म स्वीकारला तर धर्मातरित व्यक्तीला अशा संपत्तीत हिस्सा मिळेल.
- (लॅप्सलोकी नियम)

## चार्ल्स मेंटाकाल्फ (1835-36)

- याने वृत्तपत्रांवरील बंधने काढली. म्हणून त्यांना वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्याचा जनक म्हणतात. (मुक्तिदाता)
- 1799 - मध्ये ही बंधने लॉर्ड वेलस्लीने लावली होती.

## लॉर्ड ऑक्लँड (1836-42)



- 1838-42 - प्रथम अफगाण युद्ध
- 1839 - रणजितसिंगाचा मृत्यू
- सर्वांना स्कॅलरशिप मंजूर केली. परंतु प्राधान्य इंग्रजी शिक्षण घेणाऱ्यांनाच होते.
- भारतात सर्वप्रथम दत्तवारसा नामंजूर धोरण सर्वप्रथम स्वीकारले. स्वीकारुन मांडवी, कुलाबा, सुरत ही संस्थाने ताब्यात घेतली.
  **(राज्यसेवा मुख्य 2019)**

## लॉर्ड एलेनबरो (1842-44)




- अफगाणिस्तानमधून यशस्वी माघार.
  सोरटी सोमनाथच्या मंदीराची दरवाजे आणली.
- गुलाम पद्धतीचे उच्चाटन केले.
- 1843 - च्या ॲक्ट V द्वारे.
- बलुची जमातीची पुर्नस्थापना करुन बलुचीस्थान हा प्रांत तयार केला.
- कर्नल नेपियर या व्यक्तीला या प्रांताचा स्वतंत्र गव्हर्नर म्हणून नेमले. (त्याने सिंध प्रांत ताब्यात घेतला. 1843 )
- सिंधु नदी खोऱ्यातील कच्च्या मालाचे आयात करण्यासाठी व पक्क्या मालाची निर्यात करण्यासाठी जलवाहतुक सुरु केली.
- 1843 - सिंधवर विजय
- 1843 - ग्वाल्हेरच्या शिंद्यांसोबत युद्ध

## लॉर्ड डफरिन (1884-1888)



- 28 डिसेंबर 1885 - भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना.
- 1886 - भारतात लोकसेवा आयोगाची स्थापना केली.
- **1885-86 - तिसरे बर्मा युद्ध ब्रह्मदेशाला भारतात मिसळले.**
- डफरिनच्या बायकोने लेडी डफरिन फंड सुरु केला.
  **उद्देश -** भारतीय स्त्रीयांच्या आरोग्याचे रक्षण व्हावे. या फंडातून दवाखाने, औषधालय, प्रसुतीगृह उभारण्यात आले. पं.रमाबाईंनी मदत केली होती. (सर्वाधिक फंड सुईन ला दिला.)
- इंपिरिअल सर्व्हिस ट्रुप्स योजनेतंर्गत संस्थानिकांनी स्वतःचे सैन्य ठेवण्यात परवानगी मिळाली.
- शासकीय कर्मचाऱ्यांवर राष्ट्रीय कॉंग्रेसची संबंध ठेवण्यास बंदी घातली.(1888)
- पंचदेह प्रकरण घडले. (रशिया व अफगाण या दोघांनी या गावावर हक्क सांगितला होता परंतु इंग्रजांच्या मध्यस्थीने अफगाणने आपला हक्क सोडला.)
- चार्ल्स ॲचिसन समितीची स्थापना केली, मुलकी सेवेचा अभ्यास करण्यासाठी.
  **या प्रसंगात आपण हिंदु-मुस्लिमांना एकमेकाविरुध्द लढवू शकत नाही हे विधान ॲचिसन यांनी 1857 च्या उठावादरम्यान केले होते.**

## लॉर्ड लॅन्सडाऊन (1888-94)



- 1891 - चा फॅक्ट्री ॲक्ट. हा ॲक्ट 1 जानेवारी, 1892 पासून लागू करण्यात आला व याच ॲक्टनुसार स्त्रीयांच्या कामाचे तास ठरविले. (11 तास)
- याच ॲक्टनुसार फॅक्ट्रीमध्ये काम करण्याचे तास ठरविण्यात आले.
- सिव्हिल सर्व्हिसेसचे विभाजन केले.
- डूरंड आयोगामार्फत (भारत-अफगाणिस्तान) सीमारेषा निर्धारण.
- 1892 - इंडियन कौन्सिल ॲक्ट
- याच्या कालावधीत भारत परिषद अधिनियम मांडला याचेच रुपांतर पुढे विधान परिषदेमध्ये झाले.
- राजा प्रतापसिंह प्रकरण घडून आले. (काश्मीर)
- 1891 - एज ऑफ कॉन्सेंट ॲक्ट पास केला, (बेहरामजी मलबारी) त्यास लोकमान्य टिळकांनी विरोध केला होता. (बालविवाह प्रतिबंधक कायदा)

## लॉर्ड एल्गिन दुसरा (1894-99)

- लॉर्ड एल्गिन पहिला याचा नातु होता.
- **1897 -** पुण्यात चाफेकर बंधूंनी दोन ब्रिटीश अधिकाऱ्यांची हत्या केली.
- **1896-97 -** चा भीषण दुष्काळ त्यावर लॉयल कमिशनची नियुक्ती.
- **अध्यक्ष -** जेम्स लायल.
- **1897 -** संथाल विद्रोह.
- संगीत शारदा नाटक गोविंद बल्लाळदेवल यांनी लिहिले. या नाटकातून जरठ विवाहावर टिका केली.

# लॉर्ड कर्झन (1899-1905)



- भारताबद्दल आपुलकी बाळगणारा व्हाईसरॉय होता.
- भारतामध्ये नेमणुक व्हावी यासाठी 6 वर्षे प्रयत्न केले होते.
- लॉर्ड कर्झनची तुलना गोपाळकृष्ण गोखले औरंगजेबासोबत करतात. तर लोकमान्य टिळक कर्झनला औरंगजेबाची उपमा देतात.
- बंगालच्या फाळणीचा जनक. **(ASO पूर्व 2013)**
- 19 जुलै, 1905 - बंगालच्या फाळणीची अधिसुचना दिली.
- 16 ऑक्टोबर, 1905 - बंगालची प्रत्यक्षात फाळणी केली.
- बंगालचा गव्हर्नर लॉर्ड फुल्लर याच्या मते, कर्झनला दोन बायका होत्या त्यापैकी मुस्लीम बायकोवर त्याचे जास्त प्रेम होते. म्हणून फाळणी केली.
- बंगालच्या फाळणीची मुळ संकल्पना विल्यम वॉर्ड यांची होती.
- 1896 - मध्ये त्यांना हेन्री कॉटन या विचारवंताने विरोध केला होता.(1904 मुंबई INC)
- भारतात सर्वप्रथम Dy.SP या पदाची निर्मिती केली.
- भारतात झेलम नदीच्या खोऱ्यात कालवे खादले.
- **1899 -** ला Indian Coinage & Paper Currency Act भारतीय टंकन व पत्रमुद्रा अधिनियम त्यानुसार इंग्लंडचा पौंड भारतात अधिकृत करण्यात आला.
- **1902 -** पोलीस कमिशन (सुधारणा आयोग) - ॲण्ड्रयू फ्रेजरच्या अध्यक्षतेखाली.
- **1902 - थॉमस रॅले आयोगाची स्थापना - त्यावर आधारित - भारतीय विश्वविद्यालय कायदा (1904)**
- **1899-1900** - चा दुष्काळ त्यावर ॲंथनी मॅकडोनाल्ड अध्यक्षतेखाली दुष्काळ आयोग.
- **1901** - कृषि व सिंचन आयोग कॉलीन स्कॉट मॉनक्रीफच्या अध्यक्षतेखाली.
- **1901** ला कृषिच्या विकासासाठी आय.जी. ची नियुक्ती (महा निरीक्षक)
- पुसा - कृषि संशोधन केंद्र. (बिहार)
- **1900** - पंजाब भूमी हस्तांतरण कायदा.
- **1904** - सहकारी पतसंस्था/पतपेढी कायदा. शेतकऱ्यांना कमी व्याजाने कर्ज मिळावे. **(तांत्रिक सहाय्यक गट क 2016)**
- वाणिज्य व उद्योग विभागाची निर्मिती - डाक, तार, कारखाने, रेल्वे, पाणी व बंदरे या विभागाकडे.
- **1903** - रेल्वे बोर्डाची स्थापना, यात 3 सदस्य होते.
- **1899** - कलकत्ता महापालिका कायदा, निवडून जाणाऱ्यांची संख्या कमी करुन इंग्रज सदस्य वाढवले.
- कार्लाइल परिपत्रक जाहीर.(काढुन टाकलेल्या विद्यार्थ्यांसाठी)
- **1904** - प्राचीन स्मारक जतन कायदा.
- तिबेटमध्ये कर्नल यंगहजबंडच्या नेतृत्वात शिष्टमंडळ.
- **1903** - ला कर्झन इराणच्या प्रदेशातून दिवे आणले. ताजमहाल व कलकत्ता मेमोरियल हॉल सजविण्यासाठी. **(शि.म.परांजपे यांनी त्यांच्या हिस्टॉरिकल म्युझिअम या पुस्तकात कर्झनच्या पुरातत्व ज्ञानाचा उपहास केला होता.)**
- **वायव्य सरहद्द धोरण -** सीमा भागातील ब्रिटिश सैन्य काढले, लष्करी महत्त्वाची ठिकाणे रेल्वेने जोडली, नवा 'वायव्य सरहद्द प्रांत' निर्माण केला.
- लष्कर सेनापती किचनर व कर्झन यांच्यात अधिकारांच्या कक्षेवरुन वाद झाला.
- **1901** ला रॉयल नेव्हीची स्थापना.
- इंपिरियल कॅडेट कोअरची स्थापना. संस्थानिकांच्या मुलांना उच्च शिक्षण देण्यासाठी.
- कर्झनने भारतातील पहिला ग्रीन हाऊस तयार केला कारण शेतकी संशोधनला चालना देण्यासाठी. बिहार मधील पुसा या ठिकाणी स्वतंत्र शेतकी विभाग स्थापन केला.
- कर्झनने खाणीत काम करणाऱ्या मजुरांच्या हितासाठी माईन ॲक्ट पास केला तर आसाममधील चहाच्या मळ्यात काम करणाऱ्या मजुराच्या हितासाठी लेबर ॲक्ट पास केला.

**कर्झनच्या काळातील विविध समित्या :-**

1. **1900 -** दुष्काळ समिती - सर मॅक्डोनॉल्ड
2. **1902-03** - रेल्वे चौकशी - सर थॉमस रॉबर्टसन
3. **1902 -** विद्यापीठीय कामकाज - थॉमस रॅले व गुरुदास बॅनर्जी
4. **1902** - पोलीस व गुन्हेगारी - ॲन्ड्रु फ्रेझर
5. **1903** - जलसिंचन - व्होलवीन स्कॉट मॉनक्रिफ
6. **1904 -** पतपेड्या निर्मिती - फेडरिक निकोलसन

- लॉर्ड कर्झनची तुलना कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर (नेपाळ प्रकरण) यांनी किचकाशी किचकवध या नाटकात केली.
  **किचक** - कर्झन, **द्रौपदी** - भारतमाता, **भीम**-लोकमान्य टिळक
- कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर लोकमान्य टिळकांचे अनुयायी होते. परंतू कांही दिवसानंतर ते महात्मा गांधीजींचे अनुयायी झाले.

## लॉर्ड मिंटो दुसरा (1905-1910)




- बंगाल विभाजनाचा विरोध व स्वदेशी आंदोलन.
- 1906 चे कलकत्ता अधिवेशन.
- काँग्रेसचे विभाजन (1907) सुरत.
- मुस्लीम लीग - 1906.
- मोर्ले - मिंटो सुधारणा - 1909.
- वृत्तपत्र अधिनियम - 1908.

**लॉर्ड मोर्ले :-**

- लोकासाठी सुधारणा करण्याच्या दिशेने आपण पावले उचलावीत.
- **आपण सुधारणा केल्या नाहीत तर मागण्या वाढतील व त्यांना राष्ट्रीय स्वरुप प्राप्त होईल.**
- **वसाहतीच्या स्वराज्याची मागणी म्हणजे चांदोबाची मागणी होय.**
- मोर्ले-मिंटो सुधारणेचे श्रेय माझ्या पतीला आहे. **लेडी मिंटो.**

## लॉर्ड हार्डिंग (1910-1916)



- महात्मा गांधीजींचे प्रशंसक होते. त्यांनी ऐशियाटीक रजिस्ट्रेशन ॲक्ट वर टीका केली. (1906)
- लॉर्ड हेन्री हार्डिंग्ज् - I यांचे हे नातू होते.
- **1911 -** बंगालचे विभाजन रद्द केले.
- **1911 -** राजधानी कलकत्त्याहून दिल्लीला.**(Excise पूर्व 2017)**
- **1915 -** हिंदू महासभेची स्थापना - पं. मदन मोहन मालवीय.
- **1913 -** गदर पार्टी - सॅनफ्रॅन्सिस्को.(लाला हरदयाळ)
- **1911 -** किंग जॉर्ज पाचवा व क्वीन मेरीचा राज्यभिषेक दरबार - दिल्ली
- हार्डिंग्ज्वर 23 डिसंबर 1912 दिल्लीच्या चांदणी चौकात बॉम्ब टाकण्यात आला होता. **(दिल्ली खटला)**

| | | |
|---|---|---|
| **प्रणेता** | - | रासबिहारी बोस |
| **सहयोगी** | - | वसंतकुमार विश्वास, बाल मुकूंद, अवध बिहारी, मास्टर अमिरचंद |
| **नुकसान** | - | महावत मारला गेला, हार्डिंग्ज् जखमी, लेडी हार्डिंग्ज् सुरक्षित |
| **फाशी** | - | वसंतकुमार विश्वास (11 मे 1915 अंबाला) बालमुकूंद, अवध बिहारी, मास्टर अमिरचंद (8 मे 1915 दिल्ली) |

- वरील सर्वांना जन्मठेपेची शिक्षा झाली होती. पण तत्कालिन पंजाबचा गव्हर्नर मायकेल ओडवायरने लाहोर उच्चन्यायालयात अपिल केली होती म्हणून सर्वांना फाशी झाली.
- रासबिहारी बोस हे इंग्रजाच्या हाती न लागता जपानला गेले.

# न्यायालयाची स्थापना/सुधारणा

| अ.क्र. | स्थापना/इ.स. | न्यायालय | ठिकाण | गव्हर्नर |
|---|---|---|---|---|
| 1. | **1774** | **सर्वोच्च न्यायालय** **1773-Regulating Act नुसार** | कलकत्ता | वॉर्न हेस्टिंग्ज |
| | **1772** | **जिल्हा स्तरावर - फौजदारी व दिवाणी न्यायालय** | कलकत्ता | वॉर्न हेस्टिंग्ज |
| 2. | **-** | **पंचस्तरीय न्यायव्यवस्था** | | लॉर्ड कॉर्नवॉलिस |
| 3 | **1831** | **प्रांतिक अपिल व सत्र न्यायालये रद्द** | - | विल्यम बेंटिंक |
| | **- कलकत्याचे सर्वोच्च न्यायालयाची एक शाखा - आग्रा**<br>**- न्यायालयाचे कामकाज फारशी ऐवजी - प्रादेशिक भाषा** | **बेंटींग** | | |
| 4. | **26 जुलै 1862** | **उच्च न्यायालय (1861 -इंडियन हायकोर्ट अॅक्टनुसार)** | मुंबई, मद्रास, कलकत्ता | लॉर्ड कॅनिंग |
| 5. | **1866** | **चौथे उच्च न्यायालय** | अलाहाबाद | लॉर्ड जॉन लॉरेन्स |

**- उच्च न्यायालयाचे हंगामी न्यायाधीश - रमेश मित्तल**
**(हंगामी न्यायाधिश बनलेले पहिले भारतीय)**

## युरोपियन नागरिकांचे खटले -

| | | | | |
|---|---|---|---|---|
| - | युरोपियन नागरिकांचे खटले चालवण्याचा अधिकार न्यायाधीशांना नाही | | | - विल्यम बेंटिक |
| - | **इलबर्ट बिल** ↓ **विरोधात-फिरोजशहा प्रतिआंदोलन मेहता** | - | या कायद्याने भारतीय न्यायाधीशांना युरोपियन व्यक्तीचे खटले चालविण्याचा अधिकार मिळाला. | - लॉर्ड रिपन |